**शिक्षण संचालनालय**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)
महाराष्ट्र राज्य
**मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१**

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**

**Government of Maharashtra**
**DIRECTORATE OF EDUCATION**
(Secondary & Higher Secondary)
**Maharashtra State**
**Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1**

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doecentralize11state@gmail.com


**परिपत्रक**

**क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२३/**
**दिनांक-०३/०६/२०२३**

**प्रति,**
**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
**मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर**

**विषय- इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन.२०२३-२४ ची कार्यवाही सुरु करणेबाबत.**

**संदर्भ- १. शासन निर्णय क्र.प्रवेश-२०१६/(१८०/१६)/एसडी-२ दिनांक.०७/०१/२०१७**
**२.शासन निर्णय क्र.प्रवेश-२०१८/प्रक्र.३३३/एसडी-२ दिनांक.०७/०३/२०१९**
**३.शासन निर्णय क्र.प्रवेश-२०१८/प्रक्र.३३३/एसडी-२ दिनांक.२३/०६/२०२०**
**४.शासन निर्णय क्र.प्रवेश-०४२२/प्रक्र.४१/एसडी-२ दिनांक.०९/०६/२०२२**

सन.२०२३-२४ मध्ये राज्यातील **मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहेत. उर्वरित महाराष्ट्रातील प्रवेश प्रचलित पद्धतीनुसार स्थानिक / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरुन करण्यात येतील.

इ.१०वी राज्यमंडळ निकाल जाहीर झालेला आहे. इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार असलेल्या शहरी क्षेत्रांतील प्रवेश फेऱ्यांची कार्यवाही सरु करणेत येत आहे. त्यासाठी https://11thadmission.org.in हे पोर्टल असेल. सदर संकेतस्थळास भेट देऊन विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावयाचे शहर निवडावे व प्रवेशासाठी आवश्यक पुढील कार्यवाही करावी.

**ऑनलाईन अर्ज भरणे व अन्य प्रवेश कार्यवाहीचे टप्पे खालीलप्रमाणे असतील.**

| क्र | संबंधित घटक | कार्यवाहीचा तपशील | पूर्तता |
|---|---|---|---|
| १ | **उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांसाठी** | **विद्यालय नोंदणी Jr College Registration**<br>(प्रवेश देण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी लॉगीन आयडी तयार करुन देणे, विद्यालयांची भरलेली माहिती प्रमाणित करणे, त्यामध्ये दुरुस्ती करणे इ. कार्यवाही शिक्षण उपसंचालक यांचेकडून करण्यात यावी.) | **दि.०७/०६/२०२३ पर्यंत करणे.** |
| २ | **प्रवेश प्रक्रियेची कार्यपद्धती** | • विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश दोन प्रकारे घेता येतील.<br>**१.केंद्रीय प्रवेश फेऱ्यांद्वारे Allotment मिळवून. (CAP Seats) किंवा**<br>**२.कोटांतर्गत जागांवर संबंधित विद्यालयास संपर्क साधून. (Quota Seats)** | |
| | **CAP** | • **प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भाग-१ भरुन प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. त्यानंतर,**<br>• (CAP Seats) करीता आयोजित करण्यात येणाऱ्या प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्यास अर्जाचा भाग-२ मध्ये प्रवेशासाठी विद्यालये निवडता येतील.<br>• (किमान-१ व कमाल-१०) पसंतीक्रम देता येतील.<br>• विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार CAP प्रवेश फेरीमध्ये Allotment देण्यात येईल व विद्यार्थी संबंधित विद्यालयात आपला प्रवेश निश्चित करतील. | **वेळापत्रकानुसार** |
| | **QUOTA** | • (Quota Seats) वरील प्रवेशासाठी Quota Choices मध्ये ऑनलाईन विद्यालये निवडता येतील.<br>• कोटांतर्गत प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या कोटा पसंतीनुसार यादी संबंधित विद्यालयास दर्शविण्यात येईल.<br>• सदर यादीनुसार विद्यालये कोटा निहाय गुणवत्ता यादी तयार करतील व पात्र विद्यार्थी संबंधित विद्यालयात आपला प्रवेश निश्चित करतील.<br>• **विद्यालयामध्ये झालेले सर्व प्रवेश त्या-त्या वेळी संकेतस्थळावर नोंदविले जातील.** | **वेळापत्रकानुसार** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | विद्यार्थी व मार्गर्शन केंद्र यांचेसाठी पोर्टलवर करावयाची कार्यवाही | **१)विद्यार्थी नोंदणी Student Registration.**<br>(विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करुन लॉगीन आयडी व पासवर्ड सेट करणे)<br>**२)प्रवेश अर्ज भाग-१ भरणे**<br>(भरलेला अर्ज स्वत:ची इ.१० वी माध्यमिक शाळा किंवा मार्गदर्शन केंद्र यांचेकडून प्रमाणित करुन घेणे.) | दि.१२/०६/२०२३ पर्यंत पूर्ण करणे. |
| | | **३)पसंतीक्रम देणे, भाग-२ (CAP Option Form) भरणे**<br>(प्रवेश फेरीपूर्वी प्रवेशासाठी पसंतीची कनिष्ठ महाविद्यालये ऑनलाईन निवडणे)<br>*** कोटा प्रवेशासाठी पसंती देणे, (Quota Choices) भरणे**<br>(कोटांतर्गत प्रवेशासाठी पसंतीची कनिष्ठ महाविद्यालये ऑनलाईन निवडणे) | वेळापत्रकानुसार वेळेत पूर्ण करणे |

**कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध जागांची विभागणी पुढीलप्रमाणे असेल.**

| | | बिगर अल्पसंख्याक | अल्पसंख्याक विद्यालये | |
|---|---|---|---|---|
| १ | **केंद्रीय प्रवेश फेरीद्वारे प्रवेश (CAP Seats)** | ८५% | ३५% | |
| २ | संस्थांतर्गत कोटा (InHouse Quota) | १०% | १०% | माध्यमिक असल्यास ऐच्छिक |
| ३ | व्यवस्थापन कोटा (Management Quota) | ५% | ५% | |
| ४ | अल्पसंख्याक कोटा (Minority Quota) | लागू नाही | ५०% | |

- **अल्पसंख्याक कोटा** फक्त अल्पसंख्याक कनिष्ठ महाविद्यालयात उपलब्ध असेल आणि या जागांवर अल्पसंख्याक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल.
- **इनहाऊस कोटा** हा त्यांच संस्थेची माध्यमिक शाळा संबंधित विभागात असेल तर अशा माध्यमिक शाळांमधील इ.१०वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लागू असेल.
- **व्यवस्थापन कोटा** हा त्या संस्थास्तरावरील प्रवेशासाठी असेल. सदर कोटा हा शाळांसाठी ऐच्छिक असेल.
- कोणत्याही कोटांतर्गत राखीव जागांवर पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश देणे व रिक्त जागा CAP साठी प्रत्यार्पित करणे वेळापत्रकानुसार सुरु राहील.

अर्ज भरतांना, केवळ ज्या विद्यार्थ्यांना **मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** या शहरांमधील राज्यमंडळ संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असेल अशाच विद्यार्थ्यांनी या प्रणालीच्या मध्यमातून अर्ज करावा. राज्यातील उर्वरित ठिकाणच्या प्रवेशासाठी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांशी संपर्क साधावा. अशा सूचना विद्यार्थी व पालकांना द्याव्यात.

**मुंबई महानगर क्षेत्र(MMR), पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका** क्षेत्रांतील इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रकियेच्या शून्य फेरी व नियमित फेरी-१ चे वेळापत्रक सोबत संलग्न आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

मार्गदर्शन केंद्र व माध्यमिक शाळांना विद्यार्थ्यांचे अर्ज वेळेत प्रमाणित करणेबाबत आवश्यक सूचना देण्यात येऊन ऑनलाईन प्रवेश क्षेत्रातील सर्व विद्यालये पोर्टलवर समाविष्ट झाली असल्याचे खात्री करावी. संबंधित घटकांसाठी आवश्यकतेनुसार आपल्या स्तरावरुन प्रशिक्षणाचे आयोजन करावे.

**पुणे,**
**दिनांक-०३/०६/२०२३**

**(हारुन आतार)**
**शिक्षण सहसंचालक**
**(माध्यमिक व उच्च माध्यमिक)**